# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : २५२०/ मराठी भाषा समिती (ड-१७)**

**विधान भवन, मुंबई.**

**दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२४.**

## :: परिपत्रक ::

कविवर्य श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून कविवर्य कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जयंतीदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. दोन्ही सभागृहांच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या विद्यमाने मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी **मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "कुसुमाग्रज साहित्य जागर"** हा कार्यक्रम मध्यवर्ती सभागृह, ५ वा मजला , विधान भवन, मुंबई येथे दुपारी ४.०० ते सायं.६.०० या वेळेत साजरा करण्यात येणार आहे.

उक्त कार्यक्रमात दोन्ही सभागृहातील इच्छुक सन्माननीय सदस्य, मंत्रालय आणि विधिमंडळ वातार्हर संघाचे पत्रकार व या सचिवालयातील अधिकारी /कर्मचारी यांच्या मार्फत कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कविता, ललितलेख, कथा, नाटयकृती यांचे अभिवाचन व स्वरचित कविता यांचे सादरीकरण अशा स्वरुपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या सादरीकरणामध्ये सहभागी होऊ इच्छिणारे या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांची नावे, पदनाम, सादरीकरणाचा प्रकार, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहितीचा तपशील मराठी भाषा समिती (ड-१७) कक्ष, कक्ष क्रमांक १२०४, १२ वा मजला, विधान भवन, मुंबई किंवा d17.mbs.mls@gmail.com या ई-मेल वर शुक्रवार, दि.२३ फेब्रुवारी,२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावा. तसेच या सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्याच्याकडील अधिवेशनाचे कामकाज सांभाळून या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

**( सुभाष नलावडे )**
**उप सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रति:**

१. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५. सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी.